पंचांग

- सोमवार, दिनांक १५ डिसेंबर २०२५
- मार्गशीर्ष कृ. १५, श्री शालिवाहन शके १९४७, विक्रम संवत् २०८२, विश्वावसुनाम संवत्सर, सौर हेमंत ऋतु, दक्षिणायन.
- सफला एकादशी. ■ नक्षत्र : चित्रा, योग : शोभन, करण : बव.
- सूर्योदय : ७.०६ वा., सूर्यास्त : ६.०२ वा.
- राहु काल : सकाळी ७.३० ते ९.००

राशिभविष्य

मेष : आपणास एकाग्रता वाढवण्याची आवश्यकता आहे.

वृषभ : व्यापार-व्यवसायात स्थिती नरम-गरम राहील. सावध राहा.

मिथुन : आरोग्य उत्तम राहील. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल.

कर्क : नवीन कार्याचे स्वरूप बनविण्यासाठी वेळ उत्तम.

सिंह : नोकरीवाल्यांनी कार्यात सावधगिरी बाळगावी.

कन्या : कौटुंबिक तणावाचा प्रभाव कार्यावर होऊ देऊ नका.

तूळ : घर-जमिनीसंबंधी विषयांमध्ये वेळ उत्तम राहील.

वृश्चिक : कौटुंबिक विषयांसाठी वेळ उत्तम राहील.

धनु : चढाई आपणासमोर अनपेक्षित प्रश्न उभे करेल.

मकर : व्यापार-व्यवसायात परिस्थिती सामान्य राहील. आरोग्याची काळजी घ्या.

कुंभ : संभाषणात साखरपेरी बाळगा. आर्थिक प्रश्नांची सोडवणूक होईल.

मीन : आपल्या व्यवहारामुळे आपण सहयोगी स्वभावाचे ठराल.

व्यक्तिविशेष | वल्लभभाई पटेल

'भारताचे पोलादी पुरुष' म्हणून ओळखले जाणारे पहिले उपपंतप्रधान आणि केंद्रीय गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांचा आज स्मृतिदिन.

३१ ऑक्टोबर १८७५ रोजी गुजरात येथील नाडियाद या गावी त्यांच्या आजोळी त्यांचा जन्म झाला. मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर त्यांनी वकिलीचा अभ्यास सुरू केला. कायद्याची पदवी घेतल्यावर वल्लभभाईंनी वकिली सुरू केली. लवकरच त्यांची ख्याती सर्वत्र पसरली. १९१७ मध्ये काही मित्रांच्या आग्रहावरून त्यांनी अहमदाबादमध्ये सॅनिटेशन कमिशनरची निवडणूक जिंकली. म. गांधींनी सुरू केलेल्या चंपारण्य सत्याग्रहाने गांधीजींकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन बदलला. गांधीजींचे विचार आणि त्यांची जगण्याची पद्धत यामुळे वल्लभभाई प्रभावित झाले. गुजरातमध्ये गोधरा येथे झालेल्या एका राजकीय परिषदेत वल्लभभाईंची गांधीजींशी भेट झाली. नंतर गांधीजींच्या प्रोत्साहनाने वल्लभभाईंनी बेदखिगारीविरोधात आंदोलन सुरू केले. त्यानंतर त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत स्वतःला झोकून दिले. खेडा, बोरसाड आणि बार्डोली येथे शेतमजुरांच्या हक्कांसाठी त्यांच्या नेतृत्वाखाली आंदोलने झाली. गांधीजींच्या असहकार चळवळीत त्यांनी भाग घेतला. स्वातंत्र्य चळवळीच्या काळात त्यांना अनेक वेळा तुरुंगवास भोगावा लागला. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर केंद्रीय गृहमंत्रिपद आणि उपपंतप्रधानपद त्यांच्याकडे आले. स्वातंत्र्यानंतर विविध संस्थानांना भारतात विलीन करून भारताचे ऐक्य अबाधित ठेवण्याचे महत्त्वाचे कार्य त्यांनी केले. हैदराबाद आणि जुनागढ या संस्थानांना त्यांनी खंबीरपणे भारतात विलीन करून घेतले. म्हणूनच त्यांना भारताचे पोलादी पुरुष असे म्हटले जाते. १५ डिसेंबर १९५० रोजी त्यांचे निधन झाले.

दिनविशेष

- आंतरराष्ट्रीय वंश दिन, महाराणी ताराराणीसो पुण्यतिथी, पारशी अमर्दाद मासारंभ.
- १९०५ साहित्य अकादमी विजेत्या शिक्षणशास्त्रज्ञ इरावती कर्वे यांचा जन्म.
- १९३२ कर्नाटकचे सरकारी अधिकारी टी. एन. शेषन यांचा जन्म.
- १९३३ लोकसाहित्य अभ्यासक लेखक डॉ. प्रभाकर मांडे यांचा जन्म.
- १९३५ पार्श्वगायिका व संगीतकार उषा मंगेशकर यांचा जन्म.
- १९३७ रंगसाहित्य, भाषाविज्ञान अभ्यासक कल्याण काळे यांचा जन्म.
- १९४६ भारतीय फुटबॉलपटू बायचुंग भुतियाचा जन्म.
- १९४९ छत्रपती शाहू महाराज यांचे निधन.
- १९५० माजी उपपंतप्रधान, लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचे निधन.
- १९७१ बांगलादेश स्वतंत्र झाला.

॥ ॐ रामकृष्णहरि ॥

सार्थ ज्ञानेश्वरी अध्याय क्र. ११ विश्वरूपदर्शनयोग
श्लोक ०३(पुढे चालू) ते ०४, ओवी ०८८ ते ०९२

तुझें विश्वरूपपण आघवें।
माझिये दिठीसि गोचर
होआवें । ऐसी थोर आस
जीवें । बांधोनि आहें ॥८८॥

तुझे संपूर्ण विश्वरूप माझ्या दृष्टीस दिसावे, अशी तीव्र इच्छा मी मनात धरून आहे.

मन्यसे यदि तच्छक्यं मया
द्रष्टुमिति प्रभो । योगेश्वर ततो
मे त्वं दर्शयाऽत्मानमव्ययम्
॥८॥

पण देवा! ते तुझे विश्वरूप मी पाहणे शक्य आहे असे जर तुला वाटत असेल, तर हे योगेश्वरा कृष्णा! ते तू आपले अविनाशी स्वरूप मला दाखव.

परी आणीक एक एथ
शाङ्गी । तुज विश्वरूपातें
देखावयालागीं । पैं योग्यता
माझिया आंगीं । असे कीं
नाहीं ॥ ८९ ॥
हें आपलें आपण मी नेणें ।
तें कां नेणसी जरी देव म्हणे।
तरी रोगीया काय जाणे ।
निदान रोगाचें॥ ९० ॥

पण देवा! येथे आणखी एक गोष्ट आहे. तुझ्या विश्वरूपाला पाहण्याकरिता लागणारी योग्यता माझ्या अंगी आहे किंवा नाही हे मी आपले आपणच जाणू शकत नाही. तुझी योग्यता आहे किंवा नाही, हे तू का जाणू शकत

॥ ज्ञानेश्वरी ॥

नाहीस, असे जर, देवा ! तुम्ही म्हणाल, तर रोगी आपल्या रोगाचे निदान जाणतो काय ?

आणि जी आर्तीचेनि पडिभरें
। आर्त आपली ठाकी पैं
विसरे । जैसा तान्हेला म्हणे
न पुरे । समुद्र मज॥ ९१ ॥

आणि ज्याप्रमाणे अत्यंत तहानलेला पुरुष जसा मला समुद्रही पुरेसा होत नाही असे म्हणतो, त्याप्रमाणे महाराज ! इच्छा करणाऱ्या पुरुषाची इच्छा अत्यंत वाढली असता त्याला आपल्या योग्यतेचा विसर पडतो.

ऐशा सचाडपणाचिये भुली ।
न सांभाळये समस्वा आपुली
। यालागीं योग्यता जेथीं
माउली । बाळकाथी जाणे
॥ ९२ ॥

अशाप्रमाणे अत्यंत इच्छेच्या वेगामुळेच भूल पडून, माझ्याने आपली योग्यता सांभाळली जात नाही; म्हणून आई जशी आपल्या मुलाला काय व किती पचेल, हे जाणते.

(क्रमशः)

-जगदीश गो. पाटील
डोकी, ता. जि. धाराशिव

सरकारने युवकांना वाऱ्यावर सोडले

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थींच्या भविष्याचे काय ? ■ विजय वडेट्टीवार आक्रमक

नागपूर : प्रतिनिधी

निवडणुकीआधी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना आणली, आता ही योजना बंद करून टाकली. ना मुलांनी सरकारसाठी प्रचार केला, तुमच्यासाठी निवडणुकीत ते रावले त्याचे बक्षीस काय दिले तर आंदोलन केले म्हणून बेदम मारहाण केली, यातील मुलांना फ्रॅक्चर झाले आहेत, इतकी असंवेदनशील वृत्ती सरकारची आहे. या मुलांच्या भविष्याचे काय? तत्कालीन मुख्यमंत्री म्हणाले होते त्यांना आम्ही सेवेत कायम करू त्याचे काय झाले असा आक्रमक पवित्रा काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत घेतला.

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीपूर्वी राज्य सरकारने मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना आणली होती. या प्रशिक्षणार्थींना रोजगार देण्याचे आश्वासन तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी दिले होते. आता त्या तरुणांना रस्त्यावर सोडले आहे. १३ डिसेंबर रोजी या तरुणांनी रोजगारासाठी आंदोलन केले तर त्यांना मारहाण केली. या प्रकरणावर उत्तर देताना मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी या प्रशिक्षणार्थींना आम्ही नवीन योजनेत सामावून घेऊ, आम्ही याबाबत नवीन धोरण करणार आहोत असे आश्वासन सभागृहात दिले.

पुढे बोलताना विधानसभेत प्रश्नोत्तराच्या काळात विजय वडेट्टीवार यांनी राज्यातील भाकड जनावरांबाबत प्रश्न उपस्थित केला. राज्यात गोवंश हत्याबंदी कायदा आहे. जेव्हा शेतकरी जनावरांची वाहतूक करतात तेव्हा त्यांना थांबवले जाते, धमकी दिली जाते, ऐकले नाही तर मारहाण केली जाते. एका १७ वर्षांच्या शेतकऱ्याला इतकी मारहाण केली की त्याने आत्महत्या केली. भाकड जनावर विकून शेतकऱ्यांना काही पैसे तरी मिळतात. पण आता या बोगस टोळ्या शेतकऱ्यांच्या गाड्या थांबवून त्यांच्याकडून पैसे वसूल करतात. बाविरोधात सरकारने कारवाई केली पाहिजे, ही वसुली थांबवली पाहिजे.

'महाज्योती' परीक्षेचे प्रशिक्षण ऑफलाईन करावे

विधानसभेत प्रश्नोत्तराच्या काळात वडेट्टीवार यांनी ओबीसी विद्यार्थ्यांचा प्रश्न मांडला. विद्यार्थ्यांना प्रशिक्षण ऑनलाईन देण्यात येणार असल्याने त्यांचे वियोतन मिळालेले नाही. विद्यार्थ्यांनी काल आंदोलन देखील केले. यावर्षी 'महाज्योती'ला जो निधी दिला आहे तो कमी आहे.. लोकसंख्येच्या हिशोबाने महाज्योतीला अधिकचा निधी द्यावा तसेच महाज्योतीला गेल्यावर्षीचा निधी देखील प्रलंबित आहे. तो ही देण्यात यावा अशी मागणी काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत केली.

निधीबाबत तरतूद करण्यात येईल : मुख्यमंत्री फडणवीस

मंत्री अतुल सावे यांनी ऑफलाईन प्रशिक्षणाची मागणी असेल तर ऑफलाईनही देण्यात येईल हे स्पष्ट केले. निधी कमी दिला यावर उत्तर देताना मुख्यमंत्री म्हणाले ज्या विभागाला कमी निधी देण्यात आला आहे याबाबत अर्थमंत्री अजित पवार यांच्याबरोबर बैठक झाली आहे, मार्चमधील पुरवणी मागण्या आणि अर्थसंकल्पात याची तरतूद करण्यात येईल असे आश्वासन दिले.

मराठी माणूस पंतप्रधान होईल

माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांचा दावा

पुणे : दिल्लीच्या राजकारण मोठा भूकंप होणार असून आताचे पंतप्रधान बाजुला होतील आणि मराठी माणूस पंतप्रधान होईल, असा दावा माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केला होता. ते म्हणाले होते की महिनाभरात हा बदल होईल. मात्र, पिंपरी-चिंचवडमध्ये झालेल्या कार्यक्रमात त्यांनी बेट तारीख सांगत १९ डिसेंबरला मराठी माणूस पंतप्रधान होईल, असे सांगितले. ते म्हणाले, नवीन पंतप्रधान हा काँग्रेस नसणार आहे. त्यामुळे भाजपमधीलच नवीन चेहरा पंतप्रधान होईल. आणि कदाचित मराठी माणूस पंतप्रधान होण्याची शक्यता आहे. चव्हाण यांनी मराठी माणूस पंतप्रधान होईल, असे म्हटले मात्र कोण मराठी नेता याबाबत बोलण्याचे टाळले. त्यामुळे नितीन गडकरी यांच्याकडे अंगुलीनिर्देश केल्याचा अंदाज व्यक्त होत आहे.

अधिवेशन फक्त बिल्डरांच्या फायद्याचे

आमदार जाधवांची सरकारवर टीका

नागपूर : प्रतिनिधी

नागपूर येथे ७ दिवसीय हिवाळी अधिवेशन घेण्यात आले. पण आता यावरून शिवसेना ठाकरे पक्षाचे आमदार भास्कर जाधव यांनी सरकारवर गंभीर आरोप केले आहेत. नागपूर करारप्रमाणे विदर्भाला न्याय मिळण्यासाठी हे हिवाळी अधिवेशन व्हायला हवे होते. पण, विदर्भाच्या पदरात काहीच पडले नाही. हे अधिवेशन कोणालाही न्याय देण्यासाठी नसून फक्त पुरवणी मागण्या मंजूर करून सरकारी पैशांची उधळपट्टी करण्यासाठी आहे, अशी टीका त्यांनी यावेळी केली.

आमदार भास्कर जाधव रविवारी (१४ डिसेंबर) माध्यमांशीगोर म्हणाले की, विदर्भ वेगळा होऊ नये म्हणून झालेल्या करारानुसार वर्षातून एक अधिवेशन नागपूरला होते. या अधिवेशनात विदर्भाच्या प्रश्नांना प्राधान्य देणे अपेक्षित असते. पण, सभागृहात ज्या घोषणा झाल्या, त्या फक्त मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी-चिंचवड आणि नागपूरसारख्या मोठ्या महानगरपालिकांमध्ये मते मिळवण्यासाठीच होत्या. बिल्डरांच्या फायद्याचे निर्णय घेण्यात आले, पण विदर्भातील सामान्य माणसाला काय मिळाले? असा सवाल त्यांनी यावेळी उपस्थित केला. तसेच, यावेळी त्यांनी महायुती सरकारच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

सरकारच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करताना जाधव म्हणाले, 'कालच सभागृहात एमपीडीए कायद्याचे १०८ क्रमांकाचे विधेयक अचानक आणले गेले. त्यात अनेक घातक तरतुदी असतानाही कोणतीही चर्चा न करता ते मंजूर करण्यात आले. हे अधिवेशन केवळ आगामी निवडणुका जिंकण्यासाठी आणि लोकांना पैसे वाटण्यासाठीच घेतले गेले, हे माझे म्हणणे आता खरे ठरले आहे.

विधान भवनाचे नाव 'लक्षवेधी भवन' ठेवा

लक्षवेधींना वेळच्यावेळी उत्तरे मिळाली नाहीत, तर राज्याच्या मुख्य सचिवांवर हक्कभंग आणावा असे अध्यक्ष महोदय म्हणाले. २०२२ पासून आपल्या विधान भवनाचे नाव लक्षवेधी भवन ठेवा, असे मी म्हणालो होतो. इतके हे लक्षवेधीचे प्रकरण बरेच पुढे गेलेले आहे. या विषयात जे बोलायचे ते बोलून झालेले आहे. परंतु, त्यातून फारशी काही सुधारणा होताना दिसत नाही. त्यामुळे त्यावर फार भाष्य करण्यात काही अर्थ नाही, असे भास्कर जाधव म्हणाले.

इंदुरीकर महाराजांच्या कीर्तनात पोलिसांची एंट्री

अहिल्यानगर : प्रतिनिधी

गेल्या काही दिवसांपासून प्रसिद्ध कीर्तनकार इंदुरीकर महाराज हे चांगलेच चर्चेत आहेत. त्यांच्या मुलीच्या साखरपुड्यातील थाटमाट आणि खर्च यावरून महाराजांवर सर्व स्तरांतून टीका करण्यात आली.

दरम्यान, हा वाद मागे पडत असतानाच आता इंदुरीकर महाराज यांच्या पुण्यात आयोजित करण्यात आलेल्या एका कार्यक्रमाची चर्चा होत आहे. इंदुरीकर महाराज यांचे कीर्तन चालू असतानाच तिथे एका वाहनातून पोलिस अधिकाऱ्याने एन्ट्री केली. त्यामुळे कीर्तन काही काळासाठी थांबवावे लागले. त्यानंतर तिथे काहीसे तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

१२ डिसेंबर रोजी पुण्यातील काळेपडळ परिसरात इंदुरीकर महाराज यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले होते. कीर्तन ऐकण्यासाठ लोकांनी गर्दी केली होती. त्यामुळे मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली. परिणामी वाहतूक पोलिसांवर प्रचंड ताण पडला. लोक रस्त्यावर उभे राहून इंदुरीकर महाराज यांचे कीर्तन ऐकू लागले. दुसरीकडे वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

एकनाथ शिंदे पुन्हा मुख्यमंत्री होतील

प्रकाश आंबेडकरांचा मोठा दावा

मुंबई : प्रतिनिधी

एकनाथ शिंदे हे पुढील दोन महिन्यांत पुन्हा एकदा राज्याचे मुख्यमंत्री होतील, असा दावा वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी आज (दि.१४) केला. तसेच एकनाथ शिंदे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनाच 'खिशात घातल्याचे' विधान करत त्यांनी राज्यातील सर्वच महापालिका निवडणुकीत भाजप आणि शिवसेना शिंदे गटाची युती होईल, असे भाकितही त्यांनी केले आहे.

माध्यमांशी बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले की, एकनाथ शिंदे यांनी आपली 'स्वतःची पॉवर' पाखवून दिली आहे. शिंदे यांच्या वाढत्या ताकदीचा पुरावा म्हणून आंबेडकर यांनी महापालिका निवडणुकांच्या संदर्भात भाजप नेत्यांना घ्यावी लागलेली माघार याकडे लक्ष वेधले. राज्यातील भाजपचे जे नेते महापालिका निवडणुका स्वतंत्र लढणार असल्याचे सांगत होते, त्यांना आता माघार घ्यावी लागली आहे. सर्व महानगरपालिकांमध्ये भाजपला एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेबरोबर युती करूनच लढावे लागणार आहे.

वांद्रे वसाहतीतील रहिवाशांना कायमस्वरूपी घरे देणार

शिवेंद्रसिंहराजे भोसलेंची माहिती

नागपूर : प्रतिनिधी

वांद्रे शासकीय वसाहतीत वास्तव्यास असलेल्या नागरिकांना कायमस्वरूपी घरे देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने आधीच घेतला असून, या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात सांगितले. विधानसभा सदस्य वरुण सरदेसाई यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे प्रश्न विचारला असता त्यावर शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी माहिती दिली.

शिवेंद्रसिंहराजे भोसले म्हणाले की, मंत्रिमंडळ निर्णयानंतर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली.

मुंबई-पुण्यात 'धुरंधर'चे मध्यरात्रीचे शो सुरू

मुंबई : अभिनेता रणवीर सिंहचा 'धुरंधर' चित्रपट सध्या बॉक्स ऑफिसवर अक्षरशः धुमाकूळ घालत आहे. प्रदर्शनानंतर नऊ दिवस उलटूनही चित्रपटाची लोकप्रियता कमी झालेली दिसत नसून, अजून वाढत आहे. अनेक ठिकाणी अजूनही शो हाऊसफुल होत आहेत. यामुळे प्रेक्षकांचा वाढता प्रतिसाद पाहता आता या चित्रपटाचे मध्यरात्रीचेही शो मुंबई-पुण्यात सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

'एमआयटी'त स्मार्ट इंडिया हॅकेथॉन स्पर्धा उत्साहात

पुणे : प्रतिनिधी

ओप्टीवीस, वेलोट्रीज, ट्रेलब्रेजर्सची बाजी

येथील एमआयटी आर्ट, डिझाईन व टेक्नॉलॉजी विद्यापीठ, पुणे येथे केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या इनोव्हेशन सेल व एआयसीटीई यांच्या वतीने आयोजित राष्ट्रीय स्मार्ट इंडिया हॅकेथॉन-२०२५ स्पर्धेच्या हार्डवेअर गटाच्या अंतिम फेरीत ओप्टीवीस, वेलोट्रीज आणि ट्रेलब्रेजर्स या संघांनी विजेतेपद पटकावले. तर इनो-कोर, क्लच एसआयएच, नेफ्रॉन आणि आरोग्य शिल्ड यांनी आपापल्या गटात संयुक्तरीत्या प्रथम क्रमांक पटकावला.

एसआयएच-२०२५ या पाच दिवस चाललेल्या राष्ट्रीय हार्डवेअर गटाच्या अंतिम फेरीसाठी एमआयटी एडीटी विद्यापीठ हे महाराष्ट्रातील एकमेव निवडलेले नोडल केंद्र होते. यामध्ये देशभरातून आंध्र प्रदेश, बिहार, हरियाणा, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, ओडिशा, कर्नाटक, केरळ, जम्मू-काश्मीर, राजस्थान आणि तामिळनाडू या राज्यांतील एकूण २५ संघांची निवड झाली होती.

या स्पर्धेदरम्यान सहभागी विद्यार्थ्यांनी एआयसीटीई, रक्षा मंत्रालय, विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय तसेच केरळ सरकारच्या आरोग्य विभागासमोरील विविध समस्यांवर पर्यायी उपाय सुचवले. अंतिम फेरीत विविध स्तरांवर प्रत्येक गटातील विजेत्या संघांच्या नवकल्पनांचे परीक्षकांकडून मूल्यमापन करण्यात आले. या सर्व विजेत्या संघांच्या नवकल्पनांना भारत सरकारकडून करंडक, प्रमाणपत्रे व प्रत्येकी दोन लाख रुपयांचे पारितोषिक देण्यात आले.

स्पर्धेच्या समारोप व बक्षीस वितरण समारंभासाठी केंद्र सरकारच्या शिक्षण मंत्रालयाचे सल्लागार डॉ. राघवप्रसाद दास, डॉ. राकेश कुमार गंजू, डॉ. नरेंद्र शहा, प्रा. डॉ. सायली गणकर, प्र-कुलगुरू डॉ. रामचंद्र पुनेरी, डॉ. मोहित दुबे, डॉ. महेश चांपडे, गणेश भिसे, डॉ. निशांत टिकेकर, स्पर्धा संयोजक प्रा. सुरेश कापरे आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. कापरे यांनी केले, आभार डॉ. टिकेकर यांनी मानले, तर सूत्रसंचालन प्रा. स्नेहा वाघटकर यांनी केले.

१ जुलैपूर्वी शेतकरी... (पान १ वरून)

१ जुलैपर्यंत पीक कर्जमाफीची घोषणा

सध्या अतिवृष्टीच्या मदतीचा ताण असल्याने सरकारची आर्थिक स्थिती अडचणीची आहे. तरीही शेतकऱ्यांना पीक कर्जमाफी देण्यासाठी सरकार बांधील आहे. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी आपण निर्णय घोषित केला असून त्यासाठी समिती नेमली आहे. कर्जमाफीचा फायदा हा शेतकऱ्याला झाला पाहिजे, तो बँकांना होऊ नये अशी सरकारची भूमिका आहे. त्यामुळे आपण टप्प्याटप्प्याने उपाययोजना करत आहोत. कर्जमाफीची योजना काय असेल हे १ जुलैपर्यंत आपण जाहीर करू, असे फडणवीस यांनी सांगितले.

शक्तिपीठ महामार्ग मराठवाड्यासाठी गेमचेंजर ठरेल

नागपूर-गोवा शक्तिपीठ महामार्गाचे काम पुढील वर्षी सुरू होणार असून हा महामार्ग मराठवाड्याचे चित्र बदलून टाकेल असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला. नागपूर ते सोलापूर पर्यंत पूर्वीचा आराखडा कायम राहणार असून, तेथून पुढील मार्गाच्या आराखड्यात बदल करण्यात आले आहेत. सोलापूर, सांगली, चंदगड असा हा नवीन मार्ग असेल. या महामार्गामुळे नागपूर-गोवा हा १८ तासांचा प्रवास आठ तासांवर येणार आहे. समृद्धी महामार्ग, नांदेड-जालना मार्ग व लातूर-शाकल्याण व शक्तिपीठ महामार्ग यामुळे महाराष्ट्रात रस्त्याचे जाळे तयार होईल व ३२ जिल्हे एकमेकांना जोडले जातील. याचा खूप मोठा फायदा राज्याला होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

अधिवेशन वांझोटे....

लागले आहेत. राज्य निवडणूक आयोगाकडून या निवडणुकांची घोषणा लवकरच अपेक्षित आहे. त्यामुळे एखी दोन आठवडे चालणारे हिवाळी अधिवेशन यावेळी केवळ ७ दिवस चालते. मुंबईतील कामकाज सल्लागार बैठकीत ठरल्याप्रमाणे आज रविवारी अधिवेशनाचे सूप वाजले. सात दिवसाच्या या अधिवेशनातून ना शेतकऱ्यांना काही मिळाले ना विदर्भातील जनतेला काही मिळाले. त्यामुळे हे अधिवेशन वांझोटे ठरले अशी टीका विरोधी पक्षाने केली. अधिवेशन संपल्यावर विरोधकांनी संयुक्त पत्रकार परिषद घेत पहली. या पत्रकार परिषदेत विरोधकांनी सरकारवर निशाणा साधला. महाराष्ट्रातील जनतेला अधिवेशनातून काही तरी मिळावे म्हणून आम्ही संपूर्ण अधिवेशनात सरकारला मदत केली. मात्र, सरकारने कोणताही चांगला निर्णय घेतला नाही, अशी टीका विरोधकांनी केली.

मतचोरीविरुद्ध काँग्रेसचा...

आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधाचे बॅनर घेऊन पोहोचले आहेत. देशातील जनतेच्या न्यायालयाचा सर्वात मोठा गुन्हेगार केंद्री क्र. ४२० ज्ञानेश कुमार. निवडणूक आयोग मोदी आयोग बनला आहे. इकडे भाजपने पोस्टर जारी करत लिहिले की, तुम्ही घुसखोरांच्या सेवेत गुंतलेले रहा, आम्ही देशातील जनतेची सेवा करत राहू.

'मतचोरी' विरोधात ५५ लाख सह्या

काँग्रेस सरचिटणीस (संघटन) केसी वेणुगोपाल यांनी सांगितले की, 'मतचोरी' विरोधात सुमारे ५५ लाख सह्या गोळा करण्यात आल्या आहेत. ते म्हणाले- राहुल गांधींनी पुरावासह हा मुद्दा उपस्थित केला आहे.

● **नागपूर :** अहिल्यानगर जिल्ह्यातील शनिशिंगणापूर देवस्थानात ऑनलाईन पूजा, चहाया व लाईव्ह दर्शन सेवांमधून मोठ्या आर्थिक अपहाराचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी देवस्थानातील दोन कर्मचाऱ्यांना अटक करण्यात आल्याची माहिती गृह राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिली.

HDFC BANK
We understand your world
नोंदणीकृत कार्यालय : एचडीएफसी बँक हाऊस, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल (पश्चिम), मुंबई ४०० ०१३ आणि रिटेल पोर्टफोलिओचे व्यवस्थापन यांचे कार्यालय एचडीएफसी बँक लिमिटेड, पहिला मजला, अप्पर विंग टेक्नो सेन्टर, सांताक्रुज मार्ग (पूर्व) मुंबई ४०० ०५२

लिलाव विक्री सूचना

[illegible]

खाते क्र.	कर्जदाराचे नाव	कर्ज रक्कम रु.	मिलकतीचे विवरण
[illegible]	[illegible]	[illegible]	एचडीएफसी बँक लि., [illegible], [illegible]
[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]

[illegible]

दिनांक : १५.१२.२०२५
ठिकाण : [illegible]

सहीशिक्का/-
प्राधिकृत अधिकारी
एचडीएफसी बँक लि.